श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचालित लोकमंगल कॉलेज समुह वडाळा येथे,

श्री गणेश प्रतिष्ठापना



वडाळा:- लोकमंगल कॉलेज समूहातील विविध आस्थापनेमध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या विवीध विद्यार्थी समूहांनी एकत्रित श्री गणेश प्रतिष्ठापना या सांस्कृतिक सणाचे आयोजन केले, श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचालित लोकमंगल कॉलेज समूहाच्या सचिव डॉ अनिता ढोबळे मॅडम यांच्या निर्देशानुसार विद्यार्थी संघटनांनी विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते, त्या कार्यक्रमांमध्ये प्रामुख्याने गायन स्पर्धा, प्रश्नमंजुषा आणि शब्दकोडे स्पर्धा, संगीत खुर्ची व ग्रुप वर्क स्पर्धा, फूड स्टॉल तसेच कडधान्य, डाळी तांदळापासून त्याचप्रमाणे माती पासून श्री गणेश प्रतिमा बनवणे, चित्रकला फोटोग्राफी आणि रांगोळी, सूर फाट्या, लगोरी आणि स्टँड अप कॉमेडी अशा प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या बँड पथकाने आणि लेझीम पथकाने आणि संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री. रोहन देशमुख सरांच्या उपस्थितीत १९ सप्टेंबर गणेश चतुर्थी च्या दिवशी श्री गणेशाची प्रतिष्ठापना करण्यात आली होती.